RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष २, अंक १४६(२)] शुक्रवार, नोव्हेंबर ११, २०१६/कार्तिक २०, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २८८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ नोव्हेंबर २०१६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०.**

क्रमांक सीएसएल २०१६ /प्र.क्र. ३५ /१३ स.– महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) कलम १६५ च्या उप कलम (१) व (२) अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतच्या इतर सर्व अधिकारांनुसार राज्य शासन महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ मध्ये आणखी सुधारणा करणेसाठी खालील प्रस्तावित नियम मसुदा उक्त अधिनियम, १९६० चे कलम १६५ च्या उप कलम (३) अनुसार, जे त्यामुळे प्रभावित होणार असतील अशा सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी आणि हे मसुदा आणि नियम महाराष्ट्र शासन दिनांक १३ डिसेंबर २०१६ रोजी किंवा तद्नंतर विचारात घेईल ह्याची सूचना देण्यासाठी खालील नियम मसुदा ह्याद्वारे प्रकाशित करण्यात येत आहे.

२. ह्या मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून कोणताही आक्षेप व सूचना महाराष्ट्र शासनाचे अपर मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२ ह्या पत्त्यावर वर नमूद दिनांकापूर्वी प्राप्त झाल्यास त्यांचा शासन विचार करील.

**नियमाचा मसुदा**

१. या नियमांना महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) (२०१६ ची सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणण्यात येईल.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम, २०१४ चे नियम ७४ च्या ऐवजी पुढील नियम दाखल करण्यात येईल :—

" **७४. तात्पुरत्या रिक्त जागा.—** (१) संस्थेचा सदस्य मरण पावल्यामुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याला अनर्ह ठरविल्यामुळे अथवा संस्थेचे निवडून आलेले सदस्य अथवा अशा सदस्यांपैकी मुदत समाप्ती कालावधीपूर्वी कामकाज करण्यास असमर्थ असलेले सदस्य अथवा अन्यथा,

संस्थेची समिती अशा रिकाम्या झालेल्या जागेच्या बाबतीत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याला त्याबद्दल ताबडतोब कळवील आणि रिक्त जागा सोईस्कर असेल तितक्या लवकर भरण्यात येईल,—

(*i*) जर समितीची निम्मी मुदत संपली नसेल तर पोटनिवडणुकीने अशा रिक्त जागा भरता येईल आणि या नियमातील तरतुदी त्याकरिता योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

(*ii*) जर समितीची निम्मी मुदत संपली असेल तर अशी रिक्त झालेली जागा ज्या प्रवर्गातील आहे त्याच प्रवर्गातील सदस्यांमधून, नामनिर्देशनाने, उर्वरित समिती सदस्यांच्या सभेमध्ये समितीकडून भरण्यात येईल, अशी सभा राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण किंवा जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने, याच प्रयोजनासाठी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली होईल.

(२) पोटनियम (१) अनुसार अशाप्रकारे निवडून आलेला किंवा नामनिर्देशित केलेला सदस्य, जर जागा रिकामी झाली नसती तर, ज्या सदस्याच्या जागी तो निवडून आला असेल किंवा नामनिर्देशित केला असेल, तो समितीचा सदस्य जोपर्यंत त्या पदावर राहिला असता फक्त तेवढ्याच मुदतीपर्यंत पदावर राहील.''

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**एस. एस. संधू,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## CO-OPERATION, MARKETING AND TEXTILES DEPARTMENT

Mantralaya (Annexe), Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mumbai 400 032, dated 11th November 2016

*NOTIFICATION*

MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

No. CSL-2016/C.R. 35/13-C. — The following draft of rules further to amend the Maharashtra Co-operative Societies (Election to Committee) Rules, 2014, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*2*) of section 165 of the Maharashtra Co-operative Societies Act, 1960 (Mah.XXIV of 1961) and of all other powers enabling it in that behalf, is hereby published as required by sub-section (*3*) of section 165 of said Act, for the information of all the persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after 13th December 2016.

2. Any objections or suggestions, which may be received by the 13th December 2016, from any persons with respect to the said draft before the aforesaid date, will be considered by the Government.

*DRAFT RULES*

1. These rules may be called the Maharashtra Co-operative Societies (Election to Committee) (2016 Amendment) Rules, 2016.

2. For rule 74 of the Maharashtra Co-operative Societies (Election to Committee) Rules, 2014, the following rule shall be substituted, namely.–

"*74. Casual vacancies.*– (1) In the event of the vacancy occurring on account of death, resignation, disqualification or removal of a elected committee member of a society or through such a member becoming incapable of acting prior to the expiry of his term of office or otherwise, the committee of the society shall forthwith communicate the occurrence of such vacancies to the State Co-operation Election Authority and District Co-operation Election Officer and the vacancy shall be filled as soon as conveniently :–

(*i*) If half of the tenure of the committee is not expired, by way of bye-election, and the provisions of these Rules shall thereupon *mutatis mutandis* apply accordingly ;

(*ii*) If the half of the tenure of the committee is expired, by the committee by way of nomination out of the same class of the members in respect of which casual vacancy has arisen in the meeting of the remaining members of the committee, which shall be presided over by an officer authorized by State Co-operation Election Authority or District Co-operation Election Officer, in this behalf.

(2) The member so elected or nominated under sub-rule (1) shall hold office so long only as the member of the committee in whose place he is elected would have held it, if the vacancy had not occurred."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. S. SANDHU,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.